नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०६/२०२६ (सोमवार )**

## पोलीस स्टेशन कुही अंतर्गत खुनाचा गुन्हा उघड
## खुन करणारा अज्ञात आरोपी ६ तासात निष्पन्न, आरोपीला अटक
## कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— श्रीमती अंजना विनायक तुमडाम, रा. आकोली ता.कुही यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की फिर्यादीचे पती मृतक विनायक लक्ष्मण तुमडाम , वय ६५ वर्षे, रा. आकोली ता.कुही यांना मौजा भोजापुर शिवार देशी भटटी जवळ **दि. १३/०६/२०२६ चे दुपारी ०१/०० वा.ते १४/०६/२०२६ चे सायंकाळी ०५/०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून धारधार शस्त्राने वार करून खुन केला.** सदर प्रकरणी अज्ञात आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही कलम **१०३(१)** भा. न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांच्या नेतृत्वात कुही पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीला अवघ्या ६ तासात निष्पन्न केले. दिनांक १५/०६/२०२६ रोजी **आरोपी नामे विजय वासुदेव तुमडाम, वय ३५ वर्ष, रा आकोली, ता. कुही यास पाचगाव हद्दीतून ताब्यात घेतले.** यातील मृतक हा आरोपीचा नातेवाईक असुन घरगुती कारणावरून आरोपीने मृतकाचा खुन केल्याची माहिती दिली. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# जबरी चोरीचा गुन्हा उघड, ३ आरोपी अटक
# कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे तक्रारदार नामे रामजतन छेदीलाल यादव , वय ३९ वर्ष, रा. स्मर्ती नगर, दत्तवाडी,नागपुर यांनी तक्रार दिली की, फिर्यादी हे ट्रक चालक असुन दिनांक १२/०६/२०२६ रोजी फिर्यादी हे माल ट्रक मध्ये भरून गोरखपुर जाण्या करीता निधाले होते. फिर्यादी यांचा ट्रक ब्रेक डाउन झाल्याने चौदामैल येथे उभा करून ते स्वत: गाडीमध्ये झोपले असतांना दिनांक १२/०६/२६ चे ०१/०० वा. ते ०१/३० वा. वा. दरम्यान तीन अज्ञात आरोपींनी फिर्यादीचे ट्रक चे काच लाठीने फोडुन वाहनात प्रवेश करून फिर्यादी यांचा ॲड्रॉईड फोन किंमती २०,०००/रूपये हा जबरीने चोरून नेला तसेच फिर्यादीला मारहाण केली. त्यानंतर तिन्ही अज्ञात आरोपी दुचाकी पळुन गेले. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ३०९(२),३०९(४),३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद झालेला आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनात **सदर गुहयांचे तपासात कळमेश्वर पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी यांनी गुन्हा करतांना मोटर सायकल क्र एम एच ४० डीजी ११८१ या वाहनाचा वापर केल्याचे निष्पन्न केले.** नमुद माहीती वरून दिनांक १३/०५/२०२६ रोजी **आरोपी क्रं १) बनसल राजेश डहेरिया, वय २४ वर्षे, रा. शेतकी सावंगी ता. कळमेश्वर जि. नागपूर** याला शेतकी सावंगी येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीकडे कौशल्यपुर्व विचारपुस केली असता त्याने त्याचे साथीदार **आरोपी क्र २) अविनाश श्रीराम गौतम, वय ३१ वर्षे, रा. पनवास, ता. कटंगी, जि. सिवनी, राज्य मध्यप्रदेश ह. मु. डोंगरे ले आउट, शेतकी सावंगी ता. कळमेश्वर जि. नागपूर व आरोपी क्र ३) जिवन हिरामन भलावी, वय २२ वर्षे, रा. येरला जि. नागपूर** यांच्या सह मिळुन नमुद गुन्हा केल्याची माहीती दिली. आरोपी क्रमांक २ आणि ३ यांना दिनांक १५/०६/२०२६ रोजी आरोपींना कळमेश्वर येथुन ताब्यात घेतले **नमुद तिन्ही**

**आरोपी यांना अटक करण्यात आली असुन कळमेश्वर पोलीस सदर गुन्हयाचा पुढील तपास करीत आहे.**

## चोरीचा गुन्हा उघड, ६२ हजार ६६० रूपयांचा मुद्देमाल जप्त रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :–** पोलीस स्टेशन रामटेक येथे तक्रारदार नामे श्री. शंकर जयराम सावरकर, वय ७१ वर्षे, रा.तिलक वार्ड, रामटेक यांनी तक्रार दिली की, दिनांक १२/०६/२०२६ चे सकाळी ०६.३० वा. ते ०६.४५ वा. दरम्यान फिर्यादीचे बस स्टॅण्ड चौक, रामटेक येथिल शिवशंकर हॉटेल सुरू करतांना त्यांनी शेड मध्ये टेबलावर ठेवलेली पिशवी ज्यामध्ये अंदाजे ३५,०००/– रूपये. ते ४०,०००/– रुपये होते ते कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे तक्रारी वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३०३ (२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद झालेला आहे.

**सदर गुहयांचे तपासात रामटेक पोलीसांनी कौशल्यपुर्ण तपास करुन तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक १५/०६/२०२६ रोजी आरोपी नामे लहु उर्फ लावा नंदुजी कुंभरे, वय २५ वर्षे, रा. उमरी, ता. रामटेक, जि. नागपुर याला निष्पन्न करून ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांने गुन्हयाची कबुली दिल्याने आरोपी कडुन गुन्हयात चोरीस गेलेले नगदी ३७,६६०/– रुपये आणि गुन्हयात वापरलेली मोटर सायकल एम एच ४० बी पी ९१०७ किंमती २५,०००/– रूपये असा एकुण ६२,६६० /– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५ जनावरांची सुटका, मौदा पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— दि. १५/०६/२०२६ रोजीचे पहाटे ०४/०० वाजेच्या सुमारास मौदा पोलीस हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, भंडारा ते नागपुर रोडने अवैद्यरित्या म्हशींची कत्तली करीता पिकअप मधुन वाहतुक होणार आहे. अशा माहितीवरुन माथणी शिवारातील टोल नाका येथे भंडारा ते नागपुर रोडवरील नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान महेन्द्रा कंपनीचे बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी टी ३८३० हे वाहन मिळुन आले. वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ५ म्हशींना अत्यंत निर्दयतेने कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता वाहतुक करतांना मिळुन आले. वाहन चालक/मालक आरोपी १) मोहम्मद मजिर मोहम्मद साबीर, वय ३१ वर्षे, त्याचा साथीदार २) साहील शेख रहीम शेख, वय २० वर्षे, दोन्ही रा. कळमना, नागपुर हे मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) महेन्द्रा कंपनीचे बोलेरो क्र. एम एच ४० सी टी ३८३० कि. ५,००,०००/— रुपये २) ५ म्हशी किंमती ५०,०००/— रुपये असा एकुण

५, ५०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सुटका केलेल्या जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ गौरक्षण केन्द्रात दाखल करण्यात आलेले आहे. नमुद आरोपी यांचे विरुद्ध कलम ११(१) (ड), ११(१) (इ), ११(१) (एफ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयन अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन गुन्ह्याचा तपास सुरु आहे.



# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ३८ हजार ४१० रूपयांचा मूद्देमाल जप्त, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १३/०६/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, वार्ड क्र. ३, बाजार चौक, धापेवाडा कळमेश्वर येथे निलेश बळवंतराव देवगिरकर याने त्याचे राहते घरी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वार्ड क्र. ३, बाजार चौक, धापेवाडा कळमेश्वर येथे आरोपी निलेश बळवंतराव देवगिरकर, वय ४१ वर्ष, रा धापेवाडा याच्या किरायाचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ५४.३६५ किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ३८,४१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी निलेश बळवंतराव देवगिरकर, वय ४१ वर्ष, रा धापेवाडा यांचेविरूद्ध पोस्टे सावनेर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १४/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा दिघोरा शिवारामध्ये भिवापूर रेल्वे स्टेशनच्या पडक्या इमारतीच्या बाजूला काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) पवनसिंग करतारसिंग जुनी, वय २५ वर्षे, रा भिवापुर २) गुरूदास गोकुलदास टिकापाचे, वय ३५ वर्षे, रा. भिवापुर, जि. नागपुर ३) शैलेश शंकर मेश्राम, वय ३३ वर्षे, रा. घाटउमरी, ता. भिवापुर, जि. नागपुर, ४) भारतसिंग भगतसिंग जुनी, वय ३० वर्षे, रा. भिवापुर, जि. नागपुर, ५) अरविंद अभिमन शेंडे, वय २६ वर्षे, रा. दिघोरा, ता. भिवापुर, जि. नागपुर ६) गजानन दामु पाल, वय ३६ वर्षे, रा. दिघोरा भिवापुर, जि. नागपुर** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम २३५०/—रूपये, ०२ अॅडरॉईड मोबाईल किंमती ७,०००/—रूपये, असा एकुण ९,३५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात **आला आहे.**

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १४/०६/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, उनगाव पानदान रस्तेच्या बाजूला काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे वडोदा पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राकेश ज्ञानेश्वर पेठे, वय ३० वर्ष, रा. गुमथळा २) साहेबराव नामदेवराव ढोके, वय ४५ वर्ष, रा. पारडी वार्ड नं. ०३, गुमथळा ३) प्रमोद भिष्माजी वाघ, वय ५० वर्ष, रा. पारडी वार्ड नं. ०३, गुमथळा** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम २५००/—रूपये, असा एकुण २५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात **आला आहे.**

**नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीत मौजा उमठा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ३८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** दिनांक १४/०६/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा उमठा ता. नरखेड येथे मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात जलालखेडा पोलीसांनी मौजा उमठा येथे **आरोपी पवन दाऱ्या पवार, वय २७ वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड यांचेवर कारवाई करत नमुद आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीसांनी** घटनास्थळावरून एकुण मोहाफुल गावठी दारू तसेच मोहाफुल रसायन सडवा **तसेंच प्लॅस्टीक ड्रम** असा एकुण ३८,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून रनिंग हातभट्टी नष्ट केली.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ६५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच ८०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, प्लास्टीक ड्रम असा एकुण ३८,५००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीतांविरुद्ध जलालखेडा पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने